दैनिक दिव्य मराठी

# लोणावळ्याच्या जंगलात लष्करी पर्यटनाचा प्रयोग



सुनील कडूसकर, पुणे

देशात अलीकडे वैद्यकीय तसेच कृषी पर्यटन जसे लोकप्रिय होत आहे, तसेच लष्करी संकल्पनेवर आधारित पर्यटनही आकर्षण ठरू लागले आहे. देशभक्तीची जोड लाभल्याने राष्ट्रीयत्वाची भावना जागृत करण्यासाठीही ते प्रभावी ठरू पाहात आहे. डेला समूहाने लोणावळ्याजवळील जंगलात डेला ॲडव्हेंचर ट्रेनिंग अकॅडमी (डाटा) सुरू करून अशी संकल्पना यशस्वी ठरू शकते, हे दाखवून दिले आहे.

## पर्यटनाचा नवा पायंडा

'डाटा'च्या रुपाने आपली संकल्पना प्रत्यक्षात आली, याचा विशेष आनंद असल्याचे सांगून या प्रकल्पाविषयी डेला समूहाचे प्रमुख, प्रसिद्ध डिझायनर जिमी मिस्त्री म्हणाले, कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीला धीराने तोंड देण्याकरीता आणि त्यातून आपला व इतरांचा बचाव करण्यासाठी पुरूष, महिला आणि मुलांना प्रशिक्षित करण्यासाठी दहशतवादविरोधी लढ्यात जिवाची बाजी लावणारे भारतीय सेनादलातील जवान, अधिकारी आणि ब्लॅक कॅट कमांडो यांना येथे प्रशिक्षक म्हणून नियुक्त केले आहे. 'डाटा'च्या निमित्ताने आम्ही लष्करी संकल्पनेवर आधारित पर्यटनाचा नवा पायंडा निर्माण केला आहे.



आजकाल दहशतवादी हल्ले कधी आणि कुठे होतील, याचा काही नेम नाही. त्यामुळे कायम सतर्क राहणे ही काळाचीच गरज आहे. केवळ असे हल्लेच नव्हे, तर अनेकदा पूर, आगीच्या घटनांसारख्या आकस्मिक संकटांशी सामना करण्याचीही वेळ आपल्यावर येते. अशा प्रसंगी घाबरून न जाता स्वत:चा आणि इतरांचा बचाव कसा करायचा, याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण प्रत्येकालाच मिळायला हवे. ही गरज ओळखून डेला समूहाचे प्रमुख जिमी मिस्त्री यांनी राजमाची किल्ल्याजवळ उदेवाडी येथे शिरोता धरणाच्या काठावर तीन एकर परिसरात 'डाटा'च्या रुपाने या प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध केली आहे. अशा प्रकारचे प्रशिक्षण देणारा देशातील हा पहिलाच उद्योग आहे. त्याला पंचतारांकित रिसॉर्टची जोड दिल्यानेही पर्यटकांसाठी हे आकर्षण ठरले आहे. रिसॉर्ट , व्हिला आणि ॲडव्हेंचर पार्कच्या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या या उद्योगाने ही अकॅडमी स्थापन करून साहसी पर्यटन क्षेत्रात एक उदाहरण निर्माण केले आहे.

मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शेकडो निरपराध लोकांचा बळी गेला. त्यानंतर जिमी मिस्त्री यांनी साहस प्रशिक्षणाची अशी सुविधा निर्माण करण्याचा ध्यास घेऊन तो पूर्णत्वास नेला. या ठिकाणचे प्रशिक्षण अधिक परिणामकारक आणि शास्त्रशुद्ध होण्याचे मुख्य कारण म्हणजे इथे उभी केलेली लष्करातील निवृत्त अधिकाऱ्यांची भक्कम फळी. लष्कराच्या सदर्न कमांडचे माजी प्रमुख, निवृत्त लेफ्टनंट जनरल रेमंड नऱ्होना यांच्या नेतृत्वाखाली जवानांची तरूण तुकडी येथे प्रशिक्षण देते. प्रत्यक्ष दहशतवाद्यांचा खात्मा करणारे ब्लॅक कॅट कमांडो देखील या तुकडीत आहेत.

दहशतवादी हल्ल्याच्या प्रसंगी वा अन्य आपत्कालीन परिस्थितीत घाबरून न जाता आपला बचाव कसा करायचा, याचे तंत्र येथे शिकविले जाते. तोल सांभाळत पाइपवरून चालणे, भिंत ओलांडणे, क्रॉलिंग करत पुढे सरकणे, दोरीवर चढणे, दोरीच्या सहाय्याने तयार केलेला पूल ओलांडणे, आगीतून चालणे असे १९ प्रकारचे अडथळे पार करण्याचे प्रशिक्षण येथे दिले जाते. त्याचप्रमाणे, दहशतवाद्यांकडून अचानक गोळीबार झाल्यास गर्भगळीत न होता स्वत:चा बचाव कसा करावा, याचे तंत्रही येथे शिकविण्यात येते.

या सर्वांचे प्रशिक्षण देण्यासाठी एक ते दोन दिवस कालावधीचे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यात दहशतवादी हल्ल्यापासून बचावाचे प्रशिक्षण, आपत्कालीन परिस्थितीतून स्वत:चा आणि इतरांचा बचाव करणे तसेच प्रतिकूल परिस्थितीत जंगलातही आपला निभाव कसा लागेल, या दृष्टीने सज्ज राहणे अशा कार्यक्रमांचा समावेश आहे. त्यासाठी रात्रीच्या वेळी जंगलातून भ्रमंती करण्याचा अनुभव पर्यटकांना दिला जातो. प्रत्येक व्यक्तीमध्ये एक सैनिक दडलेला असतो, ही भावना जागी व्हावी म्हणून येथे आवर्जून प्रत्येकाला लष्करी गणवेश दिला जातो. त्यामुळे प्रशिक्षण घेणाऱ्याला जवानाच्या खडतर आयुष्याची कल्पना येते.

जिमी मिस्त्री यांची ही कल्पना आता हळूहळू लोकप्रिय होऊ लागली असून डेला रिसॉर्टला येणारे अनेक पर्यटक 'डाटा'लाही भेट देत आहेत. तेथील प्रशिक्षण कार्यक्रमात लहान मुले, कुटुंब आणि वेगवेगळ्या कंपन्यांतील अधिकारी वर्गासाठी स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. युद्धभूमीवर लढाईसाठी कराव्या लागणाऱ्या नियोजनातून कार्पोरेट जगतालाही काही धडे घेता येतात. त्यामुळे त्या क्षेत्राला अशा प्रशिक्षणाचे विशेष आकर्षण आहे. गुगलसारख्या अनेक मोठ्या कंपनीतील अधिकाऱ्यांनी नुकतेच येथे प्रशिक्षण घेतले आहे. या अकॅडमीला सुनील गावस्कर, दिलीप वेंगसरकर, माधुरी दीक्षित, आदित्य ठाकरे, विश्वास नांगरे पाटील आदी अनेक नामवंतांनी भेट देऊन प्रशिक्षण सुविधेची प्रशंसा केली आहे.